
# सोलापूर जिल्हयातील श्री.सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.कुमठे येथील ऊसतोड कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती: एक भौगोलिक अभ्यास




प्रा.डॉ.एस.जे.आवट[१] , प्रा.लिगाडे डी.एन.[२]
[१]विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर .
[२]सहाय्यक प्राध्यापकवालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.



***सारांश :***

भूगोलशास्त्राच्या अभ्यासामध्ये कारखानदारी विषयास अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कारखानदारी भूगोलामध्ये अनेक घटकांचा अभ्यास केला जातो. सोलापूर जिल्हा हे प्रदिर्घ ऐतिहासिक, धार्मिक वारसा असणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयात अनेक उद्योग परंपरागत चालत आलेले आहेत. विशेषतः सोलापूरची चादर ही भारतामध्ये प्रसिध्द आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्वाधिकसाखर कारखान्याचा जिल्हा म्हणून सोलापूर जिल्हयास ओळखला जातो. त्यामुळे सोलापूर जिल्हयातील श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., कुमठे साखर कारखान्याचा परीसरात आलेल्या ऊसतोड कामगांराची सामाजिक व आर्थिक स्थिती समजावून घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखामधून केला आहे. मानवाचा विकास हा पर्यावरणावर अवलंबुन असतो. पण कारखान्यांमुळे हवेचे प्रदुषण, ध्वनी प्रदुषण यासारख्या समस्या देखील निर्माण होतात. त्याचबरोबर ऊस तोडणीस दुसऱ्या जिल्हातून लोक येतात. यामध्ये विविध जिल्हयातून येणाऱ्या ऊसतोड कामगारमध्ये विविध वर्गातील लोकसंख्येचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे कोणता समाज मागासलेला आहे हे समजण्यास मदत होते.

अभ्यासक्षेत्रातील विविध वर्गातील विचलनमूल्य ०.७२ आहे, म्हणजे ते जास्त आहे. अभ्यासक्षेत्रील सर्वाधिक लोकसंख्या एन.टी. समाजाची असून त्या खालोखाल खुल्या वर्गाची लागते.

**बीजसंज्ञा :** धार्मिक वारसा, स्टीम जनरेटर मशीन, बौध्दिक परीपक्वता, अवलंबन भार .

**प्रस्तावना:**

सोलापूर हा एक विविधतेने नटलेला जिल्हा आहे. तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. पूर्वीपासूनच सोलापूरामध्ये औद्योगिकरणाचा विकास होत आलेला आहे. म्हणून पूर्वी सोलापूर शहराला गिरणगाव असे म्हणत. तसेच या शहराला राजकीय वारसा लाभलेला आहे. सोलापूर जिल्हा हा दुष्काळी भागात जरी येत असला तरी महाराष्ट्रातील सर्वाधिक ऊस कारखान्याचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

हा साखर कारखाना सोलापूर जिल्हयातील होटगी रस्त्यावरील कुमठे या ठिकाणी २६५ एकरात वसलेला आहे. या साखर कारखान्याच्या उभारणीसाठी एक शिक्षण महर्षी तसेच सामाजिक कार्यकर्ता कै. आप्पासाहेब काडादी यांनी उत्तम प्रयत्न केले आहे. त्यासाठी त्यांनी कुमठे हे महत्त्वाचे स्थान निवडले आहे.

आप्पासाहेब काडादी यांना शिक्षण, शेती, सहकारी या सर्व क्षेत्रात आवड असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्याचे आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, ते विकसित करण्यासाठी कठोर परीश्रम घेतले. कै.आप्पासाहेब काडादी हे या साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक होते.

१९६९ या वर्षी साखर कारखान्याची नोंदणी झाली व १९७० या वर्षी औद्योगिक यंत्रणा व जमीनीची खरेदी करण्यास सुरुवात झ ाली.

२२ जानेवारी १९७३ रोजी प्रत्यक्ष उत्पादनाची सुरुवात झाली. कारखान्याचे प्रत्यक्ष उत्पादन क्षमता १२५० टन प्रतिदिन असून प्रकल्प खर्च २ करोड इतका आहे. आज या कारखान्याचे गाळप क्षमता ८ लाख २५ हजार ३६४ मे.टन प्रतिदिन इतका असून त्याचा आर्थिक विकास होत चालला आहे.

कारखान्यासाठी वीज पुरवठा हा अर्धा हंगामात एम.एस.ई.बी. वीजपुरवठा एसेस आणि इतर हंगामासाठी बॉयलर स्टीम जनरेटर मशीन यांच्यामार्फत वीज पुरवठा निर्मिती होते.

## उदिष्टे :

कोणतेही संशोधन करीत असताना त्यास निश्चित असे उद्दीष्टये असते. हे निश्चित उद्दीष्टये साध्य करण्यासाठी ऊसतोड कामगारांच्या समस्या हा अभ्यासविषय निवडला आहे. अभ्यासाचा प्रमुख हेतू खालीलप्रमाणे आहे.-

१. साखर कारखाना परिसरातील ऊसतोड कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
२. ऊसतोड कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. ऊसतोड कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

## अभ्यासक्षेत्र :

प्रस्तुत अभ्यासामध्ये सोलापूर जिल्ह्यातील श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., कुमठे व सिध्दनाथ शुगर मिल्स् लि. तिऱ्हे या दोन साखर कारखान्यांची निवड केलेली असून सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना हे सोलापूर शहराच्या दक्षिणेस व सिध्दनाथ शुगर मिल्स् लि.तिऱ्हे हे सोलापूर शहराच्या पश्चिमेस वसलेले आहे.

सोलापूर जिल्हाचे स्थान १७$^{o}$१०' ते १८$^{o}$३२' उत्तर अक्षवृत्तादरम्यान आणि ७२$^{o}$४२' ते ७६$^{o}$१५'पूर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान आहे. सोलापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १४९८५ चौ.किमी. आहे आणि सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४३१५५२७ इतकी आहे.

श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे भौगोलिक स्थान १७$^{o}$३६'४६'' उत्तर अक्षांश आणि ७५$^{o}$५६'४१'' पूर्व रेखांशाच्या ठिकाणी आहे.

**नकाशा क्रं: १**
**सोलापूर जिल्हाः अभ्यासक्षेत्राचे स्थान**



**माहीतीस्त्रोत :**

कोणत्याही संशोधन समस्येचा अभ्यास करण्यासाठी व निश्‍चित केलेली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी साधन-सामग्रीची आवश्यकता असते. यानुसार प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरूपाच्या माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. ही माहिती निरिक्षण, मुलाखत, प्रश्नावली व अनुसूची यांच्या मार्फत मिळविलेली आहे. यामध्ये २४० अनुसूची व प्रश्नावलीच्या माध्यमातून माहीती संकलित करण्यात आली आहे. तसेच व्दितीयक स्वरुपाच्या माहीतीमध्ये कारखान्याचे वार्षिक अहवाल, दैनिक वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ माहिती स्त्रोत म्हणून वापरण्यात आली आहेत. यासाठी सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन इ. प्रकारातील शोध ग्रंथांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**अभ्यासपध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधातील ऊसतोड कामगारांच्या समस्यांचा अभ्यासासाठी प्राथमिक साधन सामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व अनुसूचीचा वापर करण्यात आला असून यासाठी कोटा या नमुना पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्याआधारे २४० अनुसूची व प्रश्नावली भरुन घेतले आहे. तयार केलेली माहिती योग्य त्या सारणीत वर्गीकरण करून विविध टेबल तयार केले आहेत. तसेच ऊसतोड कामगारांच्या सामाजिक आर्थिक स्थिती स्पष्ट करण्यासाठी विविध ठिकाणी आलेख, आकृत्या, नकाशे तयार करण्यात आले असून त्या करीता संगणकामधील Auto CAD, Microsoft Excel या Softwares चा वापर करण्यात आला आहे. मिळालेल्या मााहितीनुसार विविध वर्गातील विचलनानुसार काढण्यासाठी खालील सांख्यिकी सुत्रांचा उपयोग करण्यात आला आहे.

$$\text{विचलन मूल्य} = \frac{\sum fifj}{n*\{(n-१)/२\}*[F/n]}$$

fi= i वर्गाची वारंवारीता fj वर्गाची वारंवारीता

n जात धर्माची संख्या F जात धर्माची एकूण वारंवारीता

या सुत्राच्या आधारे विविध वर्गातील विवेचन करण्यात आले आहे.

**ऊसतोड कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती :**

**१. शिक्षण :**

शहरे ही नेहमी शिक्षणाची केंद्रे असतात, परंतु काही ठिकाणांना विशेषत: शिक्षणामुळे महत्त्व प्राप्त होते. अशा ठिकाणी विद्यापीठे, संशोधन केंद्रे, महाविद्यालये व इतर शिक्षणसंस्था असतात. अशा ठिकाणी आसपासच्या ठिकाणाहून तसेच दूरदूरच्या ठिकाणाहून असंख्य विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यामुळे त्या ठिकाणांची प्रगती होते. उदा. पुणे, बनारस, अलिगढ, मॉस्को, ऑक्सफर्ड, केंब्रिज इ. ठिकाणाची शिक्षणामुळे प्रगती झाली आहे. अशाप्रकारे शिक्षण ही जीवन प्रगतीतील महत्त्वाची बाब आहे.कमी साक्षरता हे देशाच्या आर्थिक विकासातील मोठी अडसर असते. म्हणून कमी साक्षर असलेले देश मागासलेले आहेत. याउलट जास्त साक्षरता असलेले देश जास्त प्रगती केलेले दिसून येतात.

एखादयाचे स्वतःच्या मातृभाषेत लिहीणे व वाचण्याचे सामर्थ्य म्हणजे साक्षरता होय. आंतरराष्ट्रीय रुढीनुसार साक्षर म्हणजे माणसाची कोणत्याही भाषेतील किमान संदेश वाचण्याची व लिहीण्याची क्षमता होय.

आर्थिक स्थिती व साक्षरता यामध्ये संबंध आहे. आम्ही केलेल्या सर्वेक्षणानुसार २४० कुटूंब प्रमुखापैकी पहीली ते सातवीपर्यत शिक्षण घेतलेल्यांची संख्या जास्त आहे. त्याखालोखाल आठवी ते बारावी पर्यत व शेवटी महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्यांची संख्या आहे. तर त्यांच्या कुटूंबातील सदस्यापैकी बऱ्याच लोकांचे शिक्षण चालू असून परीस्थितीमुळे अर्धवट शिक्षण सोडून आपल्या आईवडीलासोबत ऊस तोडणीसाठी आलेले आहेत.

**२. वयोगटरचना :**

जन्म आणि जनगणना यादरम्यान अंदाजित किंवा गणिती पध्दतीने काढलेला सौरवर्षाचा काल म्हणजे वय होय. हे प्रत्येक व्यक्तीचे महत्त्वाचे जैविक वैशिष्टय आहे.

वयावरुन माणसाची प्राकृतिक क्षमता व बौध्दिक परीपक्वता ठरते. वय हा सामाजिक संघटनेचा अंतर्गत भाग असल्याचे मानले जाते.वयानुसार सामाजिक भूमिका व जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. लोकसंख्येची वाढ, स्थलांतर यांच्या अभ्यासाठी वयोरचना समजून

घ्यावी लागते. वय आणि मर्त्यता यांच्यात संबंध आहे. त्याचप्रमाणे वयोमानानुसार (लोकसंख्येतील वृध्द व लहान मुले व जे कमवित नाहीत) अवलंबन भार अवलंबुन असतो. समाजातील विवाह आणि जन्मदर यावरसुध्दा वयाचा परीणाम होतो. कोणत्याही देशाच्या लोकसख्येत पुरुष व स्त्रिया हे दोन घटक असतात. मात्र या घटकातील वेगवेगळया वयोगटात त्यांचे प्रमाण सारखे असत नाही. त्यात भिन्नता आढळते. स्त्रि पुरुषाच्या निरनिराळया वयोगटावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात व त्याचा अनेक गोष्टीवर परीणाम होतो.

आम्ही केलेल्या सर्वेक्षणानुसार प्रश्नावली व अनुसूचीच्या माध्यमातून २४० कुटूंबीयांची वयोरचनेची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रं: १**

**कुटूंबीयांची वयोगटरचना**


| **अ.नं.** | **वयोगटरचना** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | ० ते १० वर्षे | १८.९८ |
| २ | १० ते २० वर्षे | २०.६५ |
| ३ | २० ते ३० वर्षे | २१.३३ |
| ४ | ३० ते ४० वर्षे | १७.५० |
| ५ | ४० ते ५० वर्षे | १०.३९ |
| ६ | ५० ते ६० वर्षे | ०५.७३ |
| ७ | ६० पेक्षा अधिक | ०५.४२ |
| | | १००.०० |

**स्त्रोत**:क्षेत्रअभ्यास करुन संशोधकाने पूर्ण केले

## ३. कुटूंबाचा आकार :

कुटूंबाचे संयुक्त व विभक्त असे दोन प्रकार पडतात. संयुक्त कुटूंबाचा आकार मोठा असून विभक्त कुटूंबाचा लहान असतो. संयुक्त कुटूंबात लहान मुलांना सांभाळण्यासाठी वडीलधारी माणसे असतात. आम्ही केलेल्या सर्वेक्षणानुसार २४०कुटूंबीयाची वर्गवारी खालील आकृतीमध्ये दाखविण्यात आली आहे.

**आकृती क्रं: १**




वरील टेबलावरुन असे सांगता येईल की, ऊसतोडणीस आलेल्या कामगारापैकी चार कुटूंब सदस्य असलेल्या कुटूंबाची संख्या सर्वाधिक असून ती ३२.९० टक्के आहे. त्याखालोखाल तीन व दोन सदस्य असलेल्या कुटूंबाची संख्या आहे ती अनुक्रमे २३.४६ व १९.२२ टक्के इतकी आहे. तर सर्वात कमी सात व एक कुटूंबीय सदस्य असलेल्या कुटूंबाची संख्या असून ती अनुक्रमे ०.३२ व १.८० टक्के इतकी आहे.

### ४. कुटूंबाचे आर्थिक उत्पन्न :

एका वर्षातील कुटूंबातील सर्व व्यक्तीकडून मिळणाऱ्या उत्पन्नाला कुटूंबाच्या संख्येने भागले असता जे एकूण उत्पन्न मिळते, त्याला वार्षिक उत्पन्न असे म्हणतात.

खालील तक्त्यात ऊसतोड कामगारांचे वार्षिक उत्पन्न दर्शविण्यात आले आहे. खालील टेबलावरुन असे सांगता येते की, ऊसतोड हंगामात ५०००० ते १०००००० रु. वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटूंबाची संख्या सर्वाधिक असून त्याची टक्केवारी ६९.२२ इतकी आहे. त्या खालोखाल ५०००० रु. पेक्षा कमी या गटाचा समावेश असून त्याची टक्केवारी २३.४५ इतकी आहे आणि शेवटी १००००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटूंबाची संख्या ती ७.३२ टक्के इतकी आहे.

**तक्ता क्रं:२**

**ऊसतोड कामगारांचे वार्षिक उत्पन्न**

| अ.नं. | वार्षिक उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ५०००० रु. पेक्षा कमी | २३.४५ |
| २ | ५०००० ते १००००० रु. | ६९.२२ |
| ३ | १००००० रु. पेक्षा जास्त | ०७.३२ |
| | एकूण | १००.०० |

**स्त्रोत**:क्षेत्रअभ्यास करुन संशोधकाने पूर्ण केले

### ५. उपजिविकेचे साधनः-

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यापैकी अन्न ही महत्त्वाची गरज आहे. मानव आपल्या दैंनदिन गरजा भागविण्यासाठी अनेक प्रकारचे व्यवसाय करीत असतो. म्हणजेच वेळप्रसंगी उपजिवीकेसाठी एका जिल्हयातून दुसऱ्या स्थलांतर करावे लागते.

**तक्ता क्रं:३**

**उपजिविकेचे साधन (जनावरे)**

| अ.नं. | जनावरे | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | शेळी | ५७ |
| २ | गाय | ४३ |
| ३ | म्हैस | १०६ |
| ४ | बैल | २७६ |
| | एकूण | ४८२ |

**स्त्रोत**:क्षेत्रअभ्यास करुन संशोधकाने पूर्ण केले

मानव दैनंदिन जीवन जगत असताना उपजिवीकेचे साधन म्हणून पाळीव प्राणी पाळीत असतो. ऊसतोडणीस येताना बैलाबरोबर गाय, शेळी व म्हैस इ. जनावरे आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी बरोबर आणली जातात. रोजच्या दुधाची सोय गाय, शेळी या जनावरामार्फत भागविली जाते.


उपजिविकेसाठी आणलेल्या जनावरामध्ये बैलाची संख्या सर्वात जास्त असून त्याची टक्केवारी ५७.२६ इतकी आहे. त्याखालोखाल म्हैशीची संख्या असून त्याची टक्केवारी २१.९९ इतकी आहे. शेळी ही गरीबाची गाय म्हणून संबोधले जात असले तरी त्यामानाने त्याची संख्या कमी असून ते ११.८२ टक्के इतकी आहे.

### ६. शेतीचा आकारः

शेती हा मानवाचा प्राथमिक स्वरुपाचा व्यवसाय आहे. प्रारंभीच्या काळात शेतीचे स्वरुप खूपच प्राथमिक व उदरनिर्वाहक होते. काळानुसार शेतीत सुधारणा होऊन तिचे स्वरुप बदलत गेले. मुख्य म्हणजे जास्तीत जास्त भागात शेतीचे पूर्वीचे भटके स्वरुप जावून तिला स्थायी स्वरुप येवू लागले. मानवी संस्कृतीचा उदय आणि विकास सुपीक नदयांच्या खोऱ्यातच झाला आहे. शेतीचे अनेक प्रकार आहेत त्यामध्ये मळयाची शेती, सखोल शेती, स्थलांतरीत शेती, व्यापारी शेती, मिश्र शेती, जिरायती शेती, बागायती शेती इ.होय.

जी शेती पावसाच्या पाण्यावर केली जाते त्यास जिरायत शेती असे म्हणतात, बागायत शेती ही पावसाचे पाणी व इतर जलसिंचन साधनाव्दारे केली जाते.

**आकृती क्रं:२**




वरील आकृतीवरुन असे सांगता येईल की, २ ते ४ एकर शेती असलेल्या ऊसकामगांची संख्या सर्वाधिक असून ते ३१.६० टक्के इतकी आहे.त्याखालोखाल २ एकरपेक्षा कमी शेती असलेल्यांची संख्या असून ते २७.०३ टक्के इतकी आहे.

### ७. स्थलांतर :

स्थलांतर ही मानवी इतिहासाइतकीच प्राचीन प्रक्रीया आहे. स्थलांतराची दिशा व गती ही विकासाच्या संधीशी निगडीत असते. स्थलांतर म्हणजे विशिष्ट काळात सामाजिक व आर्थिक परीस्थितीला दिलेला मानवी प्रतिसादच आहे. स्थलांतराच्या प्रक्रियेत दोन स्थलांतर मधील अंतर, स्थलांतराचा हेतू, स्थलांतराचा कालखंड या तीन गोष्टीना महत्त्वाचे स्थान असते. एका गावातील नेहमीचे निवासस्थान बदलून दुसऱ्या गावी दिर्घकालीन किंवा कायमच्या वास्तव्यासाठी जाणे म्हणजे स्थलांतर होय.

स्थलांतराच्या क्रियेत १५ते ३५ वर्षे वयोगटातील लोकांची संख्या जास्त असते. आपली आर्थिक स्थिती सुधारावी, आधिक समृध्द व संपन्न जीवन जगता यावे म्हणून आर्थिक घटकाची व संसाधनाची अनुकूलता असलेल्या प्रदेशात जे स्थलांतर केले जाते, त्याला आर्थिक स्थलांतर असे म्हणतात. ऊसतोड कामगारांचे स्थलांतर हे हंगामी स्वरुपाचे असते, कारण ऊस तोडण्यास जेंव्हा येतो. तेंव्हाच हे लोक ऊसतोड क्षेत्रात स्थलांतर करतात. कारण शेती नसणे, दुष्काळ यासारख्या अनेक कारणामुळे आपल्या गरजा भागविण्यासाठी ऊसतोड कामगार स्थलांतर करतात.

### ८. जात /धर्म:

जगातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची अशी एक जात असते, ती आपल्या जन्मावरुन निश्चित केली जाते. धर्म जातीचा अभ्यास अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द व जैन असे प्रमुख धर्म

**तक्ता क्रं: ४**
**ऊसतोड कामगारचे विविध जात /धर्मात विभागणी**

| अ.नं | जात धर्माचे गट | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | एन.टी. | ५६.८४ |
| २ | खुला | २५.९० |
| ३ | एस.सी. | ८.६३ |
| ४ | ओ.बी.सी. | ७.१७ |
| ५ | एस.टी. | १.१४ |
| ६ | व्ही.जे.एन.टी. | ०.३२ |
| | | |

**स्त्रोत**:क्षेत्रअभ्यास करुन संशोधकाने पूर्ण केले

आढळतात. जगात ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू व शीख हे चार प्रमुख धर्म आढळतात. या चारही धर्माची लोकसंख्या सर्वत्र आढळत नाही. धर्म किंवा जातीवर वैवाहिक स्थिती, जन्मदर व स्थलांतर यावर धर्माचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारत पाकिस्तान फाळणी, धार्मिक मतभेदातूनच झालेली आहे.

प्रश्नावली व अनुसूचीच्या माध्यमातून आम्ही केलेल्या सर्वेक्षणानुसार जाती व धर्माचे वितरणावरुन असे सांगता येईल की, एकूण जातीपैकी सर्वात जास्त संख्या एन.टी. या वर्गाची आहे. त्याखालोखाल खुल्या वर्गाची असून सर्वात कमी संख्या व्ही.जे.एन.टी. या वर्गाची असून ते ०.३२ इतकी आहे.

## ९. व्यवसाय:

जगात चालणाऱ्या आर्थिक व्यवसायाचे प्रकार व त्यातील लोकांचे प्रमाण म्हणजेच लोकसंख्येचे व्यवसायानुसार विभाजन हे लोकसंख्येचे आर्थिक अंग समजण्यासाठी उपयोगी पडते. जगात खालील चार प्रकारचे आर्थिक व्यवसाय चालतात.त्यामध्ये प्राथमिक व्यवसाय, व्दितीयक व्यवसाय, तृतीयक व्यवसाय व चतुर्थक व्यवसाय यांचा समावेश होतो. त्यात शेतीचा प्राथमिक स्वरुपाच्या व्यवसायात समावेश होतो. सगळयात लोकसंख्या ही शेती व्यवसायात गुंतलेली आहेत.

## १०. राहणीमान:

प्रत्येकाला आपले राहणीमान उच्च दर्जाचे असावे अशी इच्छा असते.अल्प श्रमात अधिक सुखी व आनंदी जीवनासाठी अत्याधुनिक सेवा आणि सुविधाचा लाभ व्हावा अशी अपेक्षा असते. काहीना तर विलासी जीवन जगण्यासाठी तीव्र लालसा असते. या हव्यासापोटी जेथे सुविधा उपलब्ध असतात. अशा केंद्राच्या किंवा शहराच्या ठिकाणी लोक स्थलांतरीत होतात.

आम्ही केलेल्या सर्वेनुसार आम्हाला असे आढळून आले आहे की, त्या ठिकाणी ऊसतोड कामगारांचे राहणीमान कनिष्ठ दर्जाचे असल्याचे दिसून आले आहे. आर्थिक परीस्थिती ही हालाखीची दिसून आली. कमी शिक्षण, ऊसतोड व्यवसायातून मिळणारा कमी मोबदला यामुळे त्याचे राहणीमानावर परीणाम झाल्याचे दिसून येतो.

## ११. वैवाहीक स्थिती :

सर्व समाजात धर्म आणि विवाहविषयक रुढी आणि चालीरीती घालून दिलेल्या आहेत. याचा उददेश समाजातील आपल्या जाती धर्माचे अस्तित्व कायम ठेवणे हे होय. आम्ही केलेल्या सर्वेक्षणानुसार काही जण पूर्ण कुटूंबासह ऊसतोडणीस आल्याचे निदर्शनास आले तर काही जण फक्त पती पत्नी आल्याचे दिसून आले.

## संदर्भग्रंथ:


१. Adarsh J Jain, Shashank Kame, Srinivas Rathod, Vinay N.Thotad and Kiran P, Design and fabrication of small scale sugarcane harvesting machine, IJMERR Vol.२ No.३ July २०१३
२. D. deurveilher , F.Chirolcu, M.chanet, J.P.Chanet , D.Boffety, ICT for traceability of sugarcane harvesting operation in small farm.
३. Guru Gopal, १९८९, Co operative Sugar and Sugar Workers Movement in Maharashtra - A study in second Maharashtra Rajya Sugar Workers Conference Nifad Nashik on १st and २nd October, १९८९
४. कारखान्याचे वार्षिक अहवाल

**५.** दैनिक वृत्तपत्रे
**६.** सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन